*नियमित फौजदारी केस नं. ६२/२०१५*
*नि. क्र. ३५*

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ चा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – मानसी मंगेश खेडेकर,

**वय**– ४३ वर्षे, **व्यवसाय** – गृहिणी,

**राहणार** – पाटगांव, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून–**

**०१**. दि. १७/०४/२०१५ रोजी मी पाटगांव येथे हजर होते. सन २००७ ते सन २०१७ या कालावधीत मी पाटगांव ग्रामपंचायतीमध्ये सरपंच या पदावर कार्यरत होते. त्यावेळी दिपक जंगम याने त्यांचे घराचे बांधकाम पुर्ण झाले होते व नंतर त्याची कागदपत्रे मागितली होती. त्यांनी मागणी केलेनुसार आमच्या कार्यालयाकडून कागदपत्रे त्यांना देण्यात आली होती. सदरची कागदपत्रे आज रोजी मला दाखविल्यास ती ओळखता येणार नाहीत. कारण त्यास खुप वर्षे झाली आहेत. मला फारसे त्याबाबत आता आठवत नाही.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. सी. एम. मांगले यांच्याकडून –**

**०२**. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायतीमध्ये घरबांधकामाच्या परवानगीचा एखाद्याचा अर्ज आल्यास, त्या अर्जाची छानननी करणे, सातबारा उतारा पाहणे, सहहिस्सेदारांची समत्ती आहे का पाहणे, इत्यादी सर्व पडताळणी केल्यानंतर परवानगी देणेबाबत कार्यपध्दती ग्रामपंचायतीमध्ये मी सरपंच असलेल्या कालावधीपुर्वीपासून अवलंबिली जायची. हे म्हणणे खरे आहे की, दिलेल्या परवानगीप्रमाणे त्या अर्जदाराने बांधकाम पुर्ण केल्यानंतर ग्रामपंचायतीकडून त्याची पाहणी करण्यात येवून मोजमापे

घेण्यात येवून नंतर त्या बांधकाम क्षेत्राची नोंद ग्रामपंचायतीच्या कर आकारणीसाठी केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, कर आकारणी उता–याची नोंदवही प्रत्येक वर्षासाठी वेगवेगळी ठेवली जाते. हे म्हणणे खरे आहे की, कर आकारणी पत्रकाच्या उता–याची सत्यप्रत मिळण्यासाठी एखाद्याने अर्ज केल्यास, ती माझ्या किंवा ग्रामसेवकांच्या स्वाक्षरीने दिली जायची. हे म्हणणे खरे आहे की, तशी सत्यप्रत देताना ती प्रत मुळ अभिलेखाप्रमाणे बरोबर आहे याची खात्री केल्यानंतरच माझ्या किंवा ग्रामसेवकांच्या स्वाक्षरीने दिली जायची.

**०३**. (साक्षीदारास निशाणी क्र. ३४ कडील कर आकारणी उतारा दाखविण्यात आला.) हे म्हणणे खरे आहे की, सदरचा कर आकारणी उतारा हा सन १९८९–१९९० सालचा असून त्यावर तत्कालिन ग्रामसेवक यांची स्वाक्षरी असून ग्रामपंचायतीचा शिक्का आहे व त्यामध्ये कृष्णा महादेव जंगम यांच्या घराचे मोजमाप ३७ x ३४ असे नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी सरपंच म्हणून कार्यरत असलेल्या कालावधीत माझ्या स्वाक्षरींची कर आकारणी उता–याची सत्यप्रत मी देत असायचे.

**०४**. (साक्षीदारास निशाणी क्र. ३७ कडील कागदपत्रांच्या यादीसोबत आरोपींतर्फे दाखल करण्यात आलेला दस्त दाखविण्यात आला.) हे म्हणणे खरे आहे की, सदरचा दस्त मी सरपंच म्हणून कार्यरत असताना माझ्या स्वाक्षरीनिशी दिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा कर आकारणी उतारा हा सन १९८९–१९९० सालचा असून त्यामध्ये कृष्णा महादेव जंगम यांच्या घराचे मोजमाप ३७ x ३४ असे नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा कर आकारणी उतारा मुळ अभिलेखाप्रमाणेच असल्याची खात्री करुन माझ्या स्वाक्षरीने देण्यात आलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, तसे उतारे देण्याची वेळ आल्यास ते कोणत्या वर्षातील आहेत, ते

वर्ष नमुद करुन तसे उतारे दिले जायचे.

०५. मी साधारण २४ वर्षांपासून ग्रामपंचायत पाटगांवच्या कार्यक्षेत्रामध्ये वास्तव्यास आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या कालावधीमध्ये मी कृष्णा जंगम व दिपक बाळ जंगम यांना पाहिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या माहितीप्रमाणे, दिपक बाळ जंगम हा आंबव कॉलेजमध्ये नोकरीस आहे. हे म्हणणे खरे आहे की, कर आकारणी पत्रकाच्या उतारा देताना वरच्या भागात असलेले कर आकारणी उता–याचे वर्ष असलेला भाग वगळून खालील भागाची सत्यप्रत देण्यात आलेली होती, असे काही घडलेले नाही.

०६. (साक्षीदारास निशाणी क्र. ३१ कडील दस्त दाखविण्यात आला.) हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ३१ कडील दस्त हा ग्रामपंचायत पाटगांव यांच्याकडील कर आकारणीचा दस्त आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा दस्त हा कर आकारणी वर्ष नमुद असलेल्या भागावर कागद ठेवून नंतर त्यांची छायांकित प्रत घेतल्याचा दस्त दिसून येतो. हे म्हणणे खरे आहे की, तो दस्त हा ग्रामपंचायत पाटगांव यांच्याकडील देण्यात आलेल्या मुळ दस्ताची छायांकित प्रत असल्याचे दिसून येते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावर ट्रु कॉपी म्हणून लायब्रेरियन राजेंद्र माने कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग यांचा शिक्का व सही असल्याचे दिसून येते. हे म्हणणे खरे आहे की, कृष्णा महादेव जंगम यांच्या घराच्या मोजमापांमध्ये अनेक ठिकाणी खाडाखोड व अक्षरे गिरवल्याचे त्यामध्ये दिसून येत आहे. हे मी सांगू शकत नाही की, सदरचा सर्व प्रकार हा दिपक जंगम याने राजेंद्र माने कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग यांचे ग्रंथपाल यांना हाताशी घेवून केलेला आहे अगर कसे. हे म्हणणे खरे आहे की, कृष्णा महादेव जंगम यांना घर बांधण्यासाठी दिलेली परवानगी व ज्या आधारे ती परवानगी दिली तो अर्ज याविषयी मला व्यक्तिशः काही सांगता येणार नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**<u>फेरतपास – सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून</u>–**

**०७.** निशाणी क्र. ३४ कडील दस्तामध्ये केवळ कृष्णा जंगम यांच्या मिळकतीचे वर्णन या सदरामध्ये मोजमापे लिहिल्याचे दिसून येते. बाकी त्यामध्ये इतर मिळकतींचे वर्णनाखाली त्यांची मोजमापे नमुद नाहीत.

**<u>फेरतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरउलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. सी. एम. मांगले यांच्याकडून</u> –**

**०८.** हे म्हणणे खरे आहे की, जी खाडाखोड दिसत आहे ती केवळ कृष्णा जंगम यांच्या घराच्या मोजमापांमध्ये दिसून येते. हे मी सांगू शकत नाही की, निशाणी क्र. ३१ व ३४ कडील दस्तांमध्ये केवळ कृष्णा जंगम यांच्या घराच्या मोजमापांमध्ये खाडाखोड दिसून येते, बाकी कोणाच्या मोजमापांमध्ये खाडाखोड दिसून येत नाही. साक्षीदार सांगते की, मी केवळ मागणी केलेल्या अर्जाप्रमाणे कागदपत्र दिलेले होते.

**फेरउलटतपास पुर्ण.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.07.29 18:30:32 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दि. २९.०७.२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

-:CERTIFICATE:-

Judgment/order/evidence in ( in RC.C. No.62/2015)

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | A. A. Shivalkar. |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Devrukh |
| Date of decision | :- | 29/07/2026 |
| Evidence signed by PO. on | :- | 29/07/2026 |
| Evidence uploaded on | :- | 29/07/2026 |